# प्रेसनोट

## आदिकवी महर्षी वाल्मीकी जंयती

जा.क्र. ६८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०५/१०/२०१७

भंडारा:— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. ०५/१०/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस उपअधीक्षक (गृह) एस. व्ही कुलकर्णी आदिकवी महर्षी वाल्मीकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

'**तमसा**' नदीच्या तिरावर घनदाट अरण्य होते. त्या अरण्यात कोळी लाकोंची वस्ती होती, व त्यांचा मासेमारीचा धंदा होता. त्यामुळे एक वाल्या नावाचा कोळी होता. तो फार क्रुर व लोभी असुन लोकांना लुबाडुन व वाटमारी करुन त्याचे जवळील धन लुबाडुन श्रीमंत होण्याची त्याची ईच्छा होती. एकदा त्याची नारदाशी भेट झाली, वाल्या म्हणाला 'ऐ' गोसावडया तुझयाजवळ काय असेल ते द्रव्य दे! नहीतर मरायला तयार हो! नारदाजवळ काहीच नसल्यामुळे त्यांनी हवेतर विना आणि चिपडया घे! असे वाल्याला म्हणुन त्याला प्रश्न विचारला तु माणसाला मारुन त्याचे धन का लुटतोस ? तेव्हा तो म्हणाला मला माझे बायको, लेकरांना सुखात ठेवायचे आहे, नारद म्हणाले तु हे पाप करतोस! व त्याचे प्रायश्चित तुला भोगावे लागतील तुझी बायको लेकरे तुझे पापाचे वाटेकरी आहेत काय? आधी विचारुन ये! तोवर मी बसुन राहतो. नारदावर विश्वास नसल्याने वाल्याने नारदाला झाडावर बांधुन ठेवले व वाल्या घरी विचारण्यासाठी गेला परंतु त्याचे पापाचे वाटेकरी होण्यासाठी कोणीही तयार झाले नाही. तसाच तो परत येवुन नारदाला सोडुन त्याचे पायावर लोळनच घेतली. व मला आज जगाचे खरे स्वरुप कळले. या जगात कुणी कुणचे नसते. यावर मला काहीतरी उपाय सांगा. त्यावर नारदांनी त्याला मुखानी रामराम म्हणत जा!म्हणजे तुझे पाप संपेल. व्याल्याने तपश्चर्या सुरु केली. त्याच्या भोवती मुंग्यानी प्रचंड वारुड तयार केले. परत नार त्याच रस्त्याने जात असता वारुळ बाजुला करुन वाल्याला समाधीतुन जागे केले. व तु पापातुन मुक्त झालास तुझा पुनर्जन्म झाला असुन तु वाल्मीकी ऋषी झालास तुझ्या वानीला तेज आले. तु रामकथा लिही. तु म्हणशील ते घडेल.

पुढे ज्या रामाचे चरीत्र 'रामायण' या नावाने लिहीले. तो श्लोक हे जगातील पहीले काव्यसमजले जाते म्हणुन वाल्मीकी ऋषी हे जगाचे आदिकवी समजले जातात. अयोध्येत येवुन त्यांनी सितेच्या बालकांना 'कुश' आणि 'लव' असे नाव त्यानीच ठेवले व त्यांना रामायण शिकविले. राम, कुश, लव व सिता यांची भेट त्यांनीच घडवुन आणली, अश्या थोर पुरूषांची जंयती आज आपण साजरी करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. सिडाम, जिवीशा भंडारा, पोनी. घुसर स्थागुशा भंडारा, सपोनी. ऊईके नियंत्रण कक्ष भंडारा, पोनी. खंडारे वायरलेस विभाग भंडारा, सपोनी. खंडाते वाचक शाखा भंडारा, पोउपनी. आडोळे दोषसिध्दी शाखा भंडारा, पोलीस मुख्यालय राखीव पोलीस निरीक्षक वर्मा साहेब, पोउपनी प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

05.10.

(एस. व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.